




दैनिक
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

newsaksharaj2021@gmail.com
संपादक : विनोद कैलास गोरे








• वर्ष ३ रे • अंक २६१ वा • पाने ४ | बुलडाणा, बुधवार, दि.०१ मे २०२४ | • RNI NO. : MAHMAR/2022/82056 • किंमत : ३ रुपये





## * निवेदन *


आज दि.०१ मे रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त दैनिक अक्षराज च्या कार्यालयाला सुट्टी असल्याने उद्या दि.०२ मे २०२४ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची सर्व वाचक, लेखक, हितचिंतक, जाहिरातदार, वृत्तपत्र विक्रेते एजंट यांनी नोंद घ्यावी.

**संपादक**
**अक्षराज मीडिया**

# उद्धव ठाकरे यांचा भाजपाला जाहीर इशारा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, पुणे :** पुणे लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवारी रविंद्र धंगेकर आणि बारामती लोकसभा मतदारसंघाच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांच्या प्रचारासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची पुण्यात जाहीर सभा पार पडली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. नरेंद्र मोदी यांनी शरद पवार यांच्यावर भटकती आत्मा अशी टीका केली होती. आता या टीकेला उद्धव ठाकरे यांनी प्रत्युत्तर दिले आहे.



**उद्धव ठाकरे काय म्हणाले?**

उद्या १ मे आहे, संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यासाठी ज्यांनी बलिदान दिले त्यांना अभिवादन करण्यासाठी मी हुतात्मा स्मारकावर जाणार आहे. पण आपल्याला फक्त अभिवादन करुन चालणार नाही तर आजच्या या सभेत आपल्याला एक शपथ घ्यावी लागणार आहे. आपल्या महाराष्ट्राची अस्मिता पायदळी तुडवली जात आहे

. महाराष्ट्रात हुकुमशाहा फिरत आहे, काही झाले तरी हा महाराष्ट्र त्यांच्या ताब्यात जावू देणार नाही, अशी मी शपथ देतो, असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला. नरेंद्र मोदी यांची पुण्यात सभा झाली. मात्र, आम्ही ज्यावेळी त्यांच्याबरोबर होतो. त्यावेळी त्यांना कधीही एवढ्या सभा घ्याव्या लागल्या नाहीत. आता त्यांच्या बरोबर जे आहेत ते ओझे वाहणारे गाढवं आहेत. मला आता त्यांची किव येते. कारण त्यांना महाराष्ट्रात कधीही एवढ्या सभा घ्याव्या लागल्या नाही तेवढ्या सभा आता घ्याव्या लागत आहेत, असा खोचक टोला उद्धव ठाकरे यांनी भाजपाला लगावला.

१० वर्ष झाले आहेत, ते पंतप्रधान होते. मात्र, अजूनही ते काँग्रेसच्या नावाने ओरडत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जनतेला महागाईचे चिमटे काढत आहेत. पण ते चिमटे त्यांनी स्वत:ला काढून पाहावे. कारण तुम्ही खरंच पंतप्रधान होतात. मात्र, आता तुमची खुर्ची जाणार आहे. एवढ्या खालच्या पातळीवर टीका करता. शरद पवार यांना ते काय म्हणाले? भटकती आत्मा. आता जशी भटकती आत्मा असती तशी ओकओकलेला आत्माही असतो, असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी केला.

**उद्धव ठाकरे यांचा भाजपाला इशारा**

भाजपाने ४०० पारचा नारा दिलेला आहे. यावर भाजापाला संविधान बदलायचे आहे, असा आरोप गेल्या काही दिवसांपासून विरोधक करत आहेत. यावरुनच आता उद्धव ठाकरे यांनी भाजपाला जाहीर इशारा दिला आहे. ते म्हणाले, भाजपावाल्यांनो याद राखा, तुम्हाला आज जाहीर इशारा देत आहे. तुम्ही परत सत्तेवर येणार नाहीच. पण घटनेला बदलण्यासाठी हात लावाल तर संपूर्ण देश पेटल्याशिवाय राहणार नाही, एवढं लक्षात ठेवा, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी पुण्यातील सभेत बोलताना दिला.

# नगरमधून २५ तर शिर्डीतून २० उमेदवार रिंगणात...!

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, अहमदनगर :** आगामी लोकसभेच्या दृष्टीने अहमदनगर जिल्ह्यातील पिक्चर आता क्लिअर झाले आहे. नगर, शिर्डी लोकसभा मतदारसंघात असणारे उमेदवार आता फायनल झाले आहेत.



काल (२९ एप्रिल) उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी जवळपास १३ उमेदवारांनी माघार घेतली असून ४५ जण मात्र रिंगणात आहेत. यामध्ये नगर लोकसभेसाठी २५ तर शिर्डीतून २० उमेदवार असतील. शिर्डीत मात्र भाऊसाहेब राजाराम वाकचौरे यांच्या विरोधात भाऊसाहेब रामनाथ वाकचौरे हे नामसाधर्म्य असणारे उमेदवार रिंगणात आहेत. अहमदनगर मतदारसंघात एमआयएम, अपक्ष लंके यांची माघार अहमदनगर मतदारसंघात एमआयएमने माघार घेतली असून महाविकास आघाडीचे निलेश लके यांच्याशी नामसाधर्म्य असलेल्या उमेदवारानेही माघार घेतली आहे. एम आयएम'चे परवेज शेख यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे.

दुसरीकडे उमेदवारी अर्ज दाखल केल्यापासून चर्चेत असलेले नीलेश साहेबराव लँके यांनीही अर्ज मागे घेतला आहे. उद्धवसेनेचे अपक्ष उमेदवार गिरीश जाधव यांनीही निवडणुकीतून माघार घेतली आहे. शिर्डी लोकसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवार सना सय्यद व संजय खामकर यांनी अर्ज मागे घेतले आहेत.

**नगरमधून 'हे' उमेदवार मैदानात**

सुजय विखे (भाजप), नीलेश लंके (राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट), उमाशंकर यादव (बहुजन समाज पार्टी), आरती हालदार (प्रबुद्ध रिपब्लिकन पार्टी), कलीराम पोपळघट (भारतीय नवजवान सेना), डॉ. कैलाश जाधव (महाराष्ट्र विकास आघाडी), रवींद्र कोठारी (राष्ट्रीय जनमंच), दत्तात्रय वाघमोडे (राष्ट्रीय जनक्रांती पार्टी), दिलीप खेडकर (वंचित बहुजन आघाडी), भागवत गायकवाड (समता पार्टी), मदन सोनवणे (राईट टू रिकॉल पार्टी), रावसाहेब काळे (बहुजन मुक्ती पार्टी), भाऊसाहेब वाबळे (भारतीय जवान किसान पार्टी), शिवाजीराव डमाळे (सैनिक समाज पार्टी), अमोल पाचुंदकर (अपक्ष), महेंद्र शिंदे (अपक्ष), मच्छिंद्र गावडे (अपक्ष), गंगाधर कोळेकर (अपक्ष),नवशाद शेख (अपक्ष), प्रविण दळवी (अपक्ष), सुर्यभान लांबे (अपक्ष), अनिल शेटकर (अपक्ष ),बिलाला गुफर शेख (अपक्ष),गोरख आळेकर (अपक्ष)

**शिर्डीतील उमेदवार रिंगणात**

भाऊसाहेब वाकचौरे (उद्धव सेना), सदाशिव लोखंडे (शिंदे सेना), चंद्रकांत दोंदे (अपक्ष), अभिजित पोटे (अपक्ष), भारत भोसले (समता पार्टी), नितीन पोळ (बहुजन भारत पार्टी),गोरक्ष बागुल (अपक्ष), सिद्धार्थ बोधक (अपक्ष), अशोक आल्हाट (जनहित लोकशाही पार्टी), सतिष पवार ( अपक्ष), संजय भालेराव (अपक्ष), रामचंद्र जाधव (बहुजन समाज पार्टी), उत्कर्षा रूपवते ( वंचित बहुजन आघाडी), गंगाधर कदम (अपक्ष), भाऊसाहेब वाकचौरे (अपक्ष), प्रशांत निकम (अपक्ष),निचिकेत खरात (अपक्ष), राजेंद्र वाघमारे (राष्ट्रीय जनक्रांती पार्टी), रविंद्र स्वामी (अपक्ष), विजयकुमार खाजेकर (अपक्ष)

## थोडक्यात

### दुचाकीस्वारास भरधाव ट्रकने चिरडले

### एकाचा मृत्यू तर दुसरा गंभीर जखमी...



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.३०, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील बारड येथील बसस्थानका जवळील राष्ट्रीय महामार्गावर भोकर मार्ग नांदेडकडे जाणाऱ्या एमएच ३४ बीजी ७४२३ सिमेंट माल वाहतूक ट्रकचे टायर फुटल्याने आज दि.३० रोजी सकाळी आठ च्या सुमारास भिषण अपघात घडला आहे हा अपघात इतका होता की वीस टन पेक्षा अधिक वजनाच्या मालवाहतूक ट्रकने उभ्या असलेल्या ९ दुचाकी चिरडत नेल्या तर नांदेडकडे जात असलेल्या एमएच २६ बीजी ७४२३ या दुचाकीस चिरडल्याने गोविंद रामजी कोडेवाड यांचा जागीच मृत्यू झाला तर दुचाकी चालक सुनील राठोड वय ४८ हा गंभीर जखमी झाले आहेत सुनिल राठोड यांच्या डोक्याला जबर मार असल्याने त्यांना खाजगी रुग्णालय यशोसाई येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे

भरधाव वेगात येणाऱ्या अवजड वाहतुकीच्या ट्रकचे टायर फुटल्याने ताबा सुटून झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वारांना चिरडल्याने गोविंद रामजी कोडेवाड (वय ७०) रा. खरबी ता भोकर यांचा जागीच मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. ताबा सुटलेल्या ट्रकने बारड (ता. मुदखेड) बसस्थानक रस्त्या लगतच्या ६ दुचाकीचा चुराडा केला असून त्यात लाखोंचे नुकसान झाले आहे.

या अपघातात दत्ता निलेवार, बालाजी मेटकर, आलिम मोमीन, आयुब खान पठाण, बालाजी रॅपणवाड, सचिन भालेराव यांच्या सह आदींच्या उभ्या असलेल्या दुचाकींचा चुराडा झाल्याने लाखोंचे नुकसान झाले आहे.

**बारड येथे अरुंद राष्ट्रीय महामार्ग !**

राष्ट्रीय महामार्ग अरुंद बांधून नाला उभा केला आहे. अनेक ठिकाणी नाला बेकायदेशीर बांधून रस्ता अरुंद केला आहे. बारड येथील राष्ट्रीय महामार्गाची चौकशी केल्यास अनेक बाबी समोर येऊ शकतात. रस्ता अरुंद आणि उंच नाला यामुळे अपघातांची शक्यता नेहमीच असणार आहे.

# सोलापुरात उष्णतेची लाट; तापमानाचा पारा ४४ अंशांवर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, सोलापूर :** लोकसभा निवडणुकीत राजकीय पक्षांचा प्रचार शिगेला पोहोचल्यामुळे सोलापुरात वातावरण तापले असताना उष्णतेची लाट आली आहे. मंगळवारी ४४ अंश सेल्सियसपर्यंत तापमानाचा पारा वाढला होता. यंदाच्या उन्हाळ्यात हे सर्वोच्च तापमान मानले जाते.



गेल्या आठवड्यापासून सोलापुरातील तापमान पुन्हा वाढत असताना गेल्या रविवारी, २८ एप्रिल रोजी तापमान ४३.७ अंशांवर गेले होते. एकीकडे लोकसभा निवडणुकीत प्रचाराची रणधुमाळी वाढल्यामुळे राजकीय वातावरण तापले असताना दुसरीकडे अंगाची लाही लाही करणाऱ्या उन्हाळ्यात तापमानाचा पारा उत्तरोत्तर वाढले आहे.

अशा तप्त वातावरणात गेल्या सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भरदुपारी तळपत्या उन्हात होम मैदानावर जाहीर सभा झाली होती. त्यानंतर मंगळवारी दुसर्या दिवशी तापमानाचा पारा आणखी पुढे सरकत तब्बल ४४ आंशांवर पोहोचल्यामुळे प्रचंड उष्मा अधिक त्रासदायक ठरला आहे. सकाळी नऊपासूनच उन्हाचे असह्य चटके सहन करावे लागत असून दुपारी रस्त्यावरील वर्दळ रोडावली आहे. बाजारपेठांमध्ये उन्हाच्या त्रासापासून बचाव करण्यासाठी रस्त्यावर ग्रीन नेटच्या पडद्यांचे मंडप उभारले जात आहेत. डोक्यावर टोपी, पांढरे गमजे घालून फिरावे लागत आहे.

तर महिलांना तोंडावर स्कार्फ लावून उन्हाच्या तडाख्यापासून बचाव करावा लागत आहे. घरात, कार्यालयात २४ तास विद्युत पंख्यापेक्षा कुलर, वातानुलित यंत्रांचा वापर करावा लागत आहे. रात्री घराच्या गच्चीवर झोपतानाही वारा खेळत नसल्यामुळे उष्णतेची धग बेचैन करीत आहे. लहान मुले झोपेतून दचकून जागे होत आहेत.

## संपादकीय



### कामगार दिन...

१ मे हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो. जगभरातील कामगारांचा गौरव करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. केवळ भारतातच नाही तर जगभरातील ८० हुन अधिक देशात या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येते. १९ व्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीनंतर जगभरातील कामगारांना रोजगार मिळू लागला. रोजगार मिळाला पण कामगारांची पिळवणूक मात्र वाढली. कोणत्याही सुविधा न देता तुटपुंजी मजुरी देत कामगारांना १२ ते १४ तास राबवून घेण्यात येऊ लागले. त्यामुळे कामगारात असंतोष निर्माण झाला. या असंतोषातूनच कामगार एकत्र आले व कामगार संघटनांची निर्मिती झाली. या संघटनांनी कामगारांची पिळवणूक थांबवण्यासाठी काही ठराव केले. त्या ठरावात केलेल्या प्रमुख मागण्या

१) कायद्याने आठ तासांचा दिवस

२) लहान मुलांना कामावर लावण्यास बंदी

३) महिला कामगारांच्या कामावर मर्यादा

४) रात्रीचे व धोक्याचे काम यासाठी खास नियम

५) कायद्याने साप्ताहिक सुट्टी

६) कामाचा मोबदला वस्तूरूपाने न देता नगद द्यावा

७) समान कामासाठी समान वेतन

या मागण्या २१ एप्रिल १८५६ रोजी ऑस्ट्रेलियातील कामगारांकडून करण्यात आल्या. ऑस्ट्रेलियातील कामगारांच्या मार्गाने जात अमेरिका व कॅनडातील संघटनांनी १ मे १८८६ रोजी मोर्चे व धरणे आंदोलनाची सुरवात केली. अशाच एका मोर्चाला पांगवताना ४ मे १८८६ रोजी झालेल्या गोळीबारात १ आंदोलनकारी ठार झाला. त्याचा निषेध म्हणून जगभरातील कामगार संघटना रस्त्यांवर उतरल्या. त्यात एका अज्ञात व्यक्तीने पोलिसांवर बॉंब टाकला. यात ८ पोलीस मृत्यू पावले, तर ५० पोलीस जखमी झाले. या घटनेच्या स्मरणार्थ १ मे १८८९ रोजी आंतरराष्ट्रीय आंदोलनाचे आयोजन करण्याची मागणी रेमंड लेविन याने पॅरिस येथे झालेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत केली. त्या परिषदेत १ मे १८९० हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याचे निश्चित झाले. १८९१ च्या दुसऱ्या परिषदेत १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याची औपचारिक घोषणा करण्यात आली. तेंव्हापासून १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून जगभरात उत्साहात साजरा केला जातो. १ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय ऐक्याचा, स्वातंत्र्याचा, मानवाकडून मानवाचे होणाऱ्या पिळवणुकीचा अंत करण्याचा प्रतीक बनला आहे. १९०५ च्या १ मे या कामगार दिनाच्या पत्रिकेत लेनिनने लिहिले आहे, कामगार - कामगारात, राष्ट्रा - राष्ट्रात, धर्मा - धर्मात असणारे शत्रुत्व नष्ट करा. या शत्रुत्वाने फक्त लुटारुंचा आणि जुलूमशहांचा फायदा होतो. कारण ते कामगार वर्गातील अज्ञातावर आणि दुफळीवरच जगत असतात. ज्यू आणि ख्रिश्चन, फिन आणि स्वीडिश, आर्मेनीयम आणि तातार, पोलिश आणि रशियन, लॅटिन आणि जर्मन असे सारे भेदभाव विसरून समाजवादाच्या झेंड्याखाली आपण सारे आगेकूच करूया. सर्व देशातील कामगारांची ही ऐक्य शक्ती आंतरराष्ट्रीय समाजवादाची संघशक्ती १ मे ला आपल्या दलाची पाहणी करते आणि स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यासाठीचा लढा निर्धाराने आणि अविचलपणे पुढे नेण्यासाठी आपले बळ संघटित करते. लेनिनचा हा विचार घेऊन जगभरातील कामगार संघटना आज मार्गक्रमित करीत आहेत. आज जगभरातील कामगार संघटनांपुढे नवे आव्हाने आहेत. जागतिकीकरणाची लाट व २१ व्या शतकातील कामगारांचे प्रश्न, बदललेली परिस्थिती, मस्तवाल झालेले भांडवलदार या नव्या आव्हानांचा मुकाबला कामगार संघटनांना करावा लागणार आहे. काळाचे हे आव्हान कामगार संघटनांनी स्वीकारले पाहिजे. जनतेच्या जगण्याला व कामगारांच्या हक्काला मिळालेले हे आव्हान आहे. याचा मुकाबला संघटित व असंघटित कामगारांच्या एकजुटीनेच होऊ शकतो.

**कामगार एकजुटीचा विजय असो!**
**जगभरातील कामगारांना**
**कामगार दिनाच्या मनापासून शुभेच्छा!**

# मंगल देशा पवित्र देशा – 'महाराष्ट्र' माझा



ज्याच्या नवातच 'महा' विशाल राष्ट्र असा नामोल्लेख आहे तो आपला महाराष्ट्र आपला ६४ वा स्थापना दिन साजरा करीत आहे. महाराष्ट्र नावाने ओळखले जाणारे आपले हे देशातील एकमेव राज्य आहे.भाषावार प्रांत रचनेच्या सुत्रानुसार बॉम्बे पुनर्गठन अधिनियम १९६० नुसार तत्कालीन मुंबई राज्याचे विभाजन होऊन गुजरात, महाराष्ट्र राज्यांची निर्मिती केली गेली. १ मे १९६० रोजी तत्कालीन पंतप्रधान कै. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी महाराष्ट्र राज्य निर्मितीचा 'मंगल कलश' राज्याचे जेष्ठ नेते कै. यशवंतराव चव्हाण यांच्या हाती सोपवला. मुंबई आणि नागपूर (उप राजधानी) अशा दोन राजधानी शहरे राज्याला लाभली आहेत. मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे यासाठी मोठी चळवळ उभारली गेली होती, त्यासाठी १०५ हुतात्म्यांना राज्याने गमावले आणि मुंबई महाराष्ट्राला मिळाली,एवढेच नव्हे तर मुंबई राज्याची राजधानी बनली. मुंबई ला वेगळे ठेवण्याचे बरेच प्रयत्न झाले, बरेच रणकंदन माजले. मात्र तेव्हा मराठी माणसाच्या 'मोडेन पण वाकणार नाही' या प्रवृत्तीचा परिचय देशाला झाला, कै. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मंत्रिमंडळात अर्थमंत्री असलेल्या कै. सी. डी देशमुख यांनी थेट मंत्रीपदाचा राजीनामा देऊन टाकला. मराठी बहुल असलेल्या कर्नाटकातील कारवार, निपाणी, बेळगाव हा भाग महाराष्ट्राला मिळावा यासाठी राज्याचा आजही लढा चालू आहे. हा वाद सुप्रिम कोर्टात प्रलंबित आहे मात्र महाजन आयोगाचा हवाला देत कर्नाटक हा विषय संपल्याची भुमिका घेत आहे. मराठवाडा, कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, खान्देश या भागाचा मिळून बनलेल्या महाराष्ट्राला ७९० किमी. किनारपट्टी लाभली असुन राज्याचे श्रेत्रफळ अंदाजे ३,०७,६९० चौ. किमी. इतके आहे.खरा विकास फक्त पश्चिम महाराष्ट्राचा झाला अशी ओरड नेहमीच होत असते मात्र विदर्भातील कै. वसंतराव नाईक, सुधाकर राव नाईक, कन्नमवार देवेंद्र फडणवीस यांनी मिळून सर्वाधिक काळ राज्याचे नेतृत्व केले आहे, तर मराठवाड्यातील कै. शंकरराव चव्हाण त्यांचे पुत्र अशोक चव्हाण यांनी राज्याचे नेतृत्व केले आहे. वेगळ्या विदर्भाची मागणी तशी फार जुनी मात्र या विषयावर फक्त राजकारण आणि सत्ताकारण केले जाते हा विदर्भाचा अनुभव आहे.

मुंबई ही मुळ सात बेटांची बनली आहे आणि कोळी समाज हा इथला मुळचा मुंबईकर,कालांतराने हे मुंबई शहर देशाची आर्थिक राजधानी, त्याच बरोबर आंतरराष्ट्रीय पातळीवरचे शहर म्हणून मुंबईने आपली ओळख जगभर निर्माण केली आहे. राज्याच्या सर्व पक्षीय धुरिणांनी केलेल्या संयुक्त प्रयत्नांचे फलित म्हणजे महाराष्ट्र हे देशाच्या आर्थिक विकासाचे इंजिन म्हणून ओळखले जाते. त्याच बरोबर एक पुरोगामी राज्य म्हणून राज्याने आपली ओळख निर्माण केली आहे. मुंबईचे रुपडे पालटु लागले आणि मुळ मराठी माणसाची ओळख असलेली मुंबई सर्वांना सामावून घेणारे कॉस्मॉपॉलिटिन शहर बनले,आणि हळुहळु परप्रांतीयाकडुन एक एक उद्योगधंदे काबीज करणे सुरू झाले. उद्योगधंद्यात गुजराती, मारवाडी, तर छोट्या मोठ्या व्यवसायात तामीळ, कर्नाटकी लोकांनी तर नोकरी मधे दक्षिण भारतीयांनी जम बसविणे सुरू केले आणि मराठी माणसामध्ये अन्यायाची भावना निर्माण होऊ लागली त्याचा वाचा फोडण्यासाठी कै. प्रबोधनकार ठाकरे यांनी १९६६ मध्ये शिवसेनेची स्थापना केली, 'बजाव पुंगी हटाव लुंगी' अंदोलन केले गेले. मराठी माणसात एकीची भावना निर्माण होऊ लागली, मात्र तरी देखील मुंबईतुन मराठी माणूस मोठ्या प्रमाणावर हद्दपार झाला आहे हे वास्तव आहे आणि त्याची जागा परप्रांतीयांनी व्यापली आहे. मुंबईचे महत्त्व करण्याचे हरतऱ्हेने विशेषतः गुजराती लॉबी कडून मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले जात आहेत आणि दुर्दैवाने आमचे राज्यकर्ते, सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, मराठी माणूस हा एकसंध नसल्याने हे प्रकार दिवसेंदिवस वाढतच चालले आहेत. 'डबल ईंजीना'चे सरकार असुन देखील महाराष्ट्राच्या तोंडचा घास काढून कधी गुजरातला तर कधी कर्नाटक ला भरवला जातो आणि आम्ही आपापसातच भांडत बसतो.मुंबई ला महाराष्ट्रापासून वेगळे केले जाणार न जमल्यास मुंबई केंद्र शासित प्रदेश केला जाणार आणि कालांतराने गुजरातला जोडली जाणार अशा चर्चा अधुन मधुन होतात आणि तसे काही होणार नाही असे ठाम पणे सांगितले जाते,मात्र रात्र वैऱ्याची आहे याची जाणीव प्रत्येक मराठी माणसाला ठेवायला हवी, त्याच बरोबर मराठी माणसाला दुहीचा शाप जडला आहे तो बदलण्याची गरज आहे. प्रादेशिक अस्मिता, एकी काय असत ते दाक्षिणात्यांकडुन शिकण्यासारखे आहे. मराठी माणूस लढवय्या आहे मात्र आपण मैदानात जिंकतो आणि तहात हरतो हा आपला इतिहास आहे. मुंबई ही मराठी माणूस, महाराष्ट्राची आन, बान, शान आहे ती अशी सहजासहजी तोडणे शक्य नाही मात्र यदाकदाचित असे काही झाले तर मराठी माणूस पेटुन ऊठल्याशिवाय रहाणार नाही.मुंबई सह महाराष्ट्र एकसंघ होता, आहे आणि भविष्यातही राहिल. दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्रात ज्या पद्धतीने राज्यात सत्तांतर घडवुन आणले गेले ते महाराष्ट्राच्या लौकिकास असे नव्हतेच, मात्र सर्वोच्च न्यायालयाने सर्व काही बेकायदेशीर ठरवुन देखील सरकार आजही कायम आहे. कोणी कोणाबरोबर जातो, युती आघाडी करतो, मोडतो असा सगळा खिचडी प्रकार महाराष्ट्रात घडत आहे. सध्यातर देशात आणि राज्यात निवडणूकीची धामधूम सुरू आहे नेते मंडळी मर्यादा सोडून एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढत आहेत, मात्र जनतेसाठी सगळे एकाच माळेचे मणी आहेत, ते महाराष्ट्राचे नाही तर आपले हित साधण्यात मश्गुल आहेत. सरकार गतीमान निर्णय वेगवान असे दावे केले जात असतांनाच राज्यात मोठय़ा प्रमाणावर शेतकरी आत्महत्या करीत आहेत विशेषतः मराठवाडा, विदर्भ या भागात. त्याच बरोबर आर्थिक कोंडी मुळे मध्यमवर्गीय, गरीब विद्यार्थी यांच्या देखील आत्महत्या वाढल्या आहेत. मुंबई नागपूर, नाशिक, औरंगाबाद, अमरावती ही शहरे गुन्हेगारीत आघाडी वर आहेत तर पुण्यासारख्या सांस्कृतिक शहराची ओळख आता कोयता गॅंगचे शहर अशी बनु लागली आहे. महाराष्ट्रातुन अनेक उद्योग धंदे राज्याबाहेर जात आहे मात्र याबाबत कोणालाच गांभीर्य उरले नाही. राज्यावर जवळपास सात लाख रुपयांचे कर्ज झाले आहे ही महाराष्ट्राची चिंता वाढविणारी बाब आहे, राज्यासमोर अनेक आव्हाने आहेत, महाराष्ट्र दिन साजरा करीत असतांना याचाही विचार प्रत्येकाने करणे गरजेचे आहे.

१ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून देखील जागतिक पातळीवर साजरा केला जातो, १८९१ पासून जागतिक पातळीवर कामगार दिन साजरा होण्यास सुरुवात झाली तर देशात पहिल्यांदाच १९२३ साली मद्रास येथे कामगार दिन साजरा झाला. जगभरात ८० हुन अधिक देशात कामगार दिन साजरा होत आहे. मुंबई, कलकत्ता, मद्रास, दिल्ली ही शहरे ४०-४५ वर्षापुर्वी कामगारांची शहरे म्हणून ओळखली जात.देशाच्या राज्याच्या विकासात कामगारांचे देखील तितकेच योगदान आहे. अनेक कामगार चळवळी या काळात घडल्या. कै. श्रीपाद अमृत डांगे, कै. जॉर्ज फर्नांडिस, कै. दत्ता सामंत अशा अनेकांनी आपले जीवन कामगार चळवळी साठी वाहुन घेतले. मात्र आर्थिक उदारीकरणाच्या काळात भांडवलशाहीला झुकते माप देत कामगारांचा आवाज दडपणे सुरू झाले, त्यासाठी कायद्यात बदल केले गेले. कोरोना संकटाच्या पार्श्वभूमीवर गेल्या वर्षी अनेक कामगार कायदे बदलले गेले काहींना स्थगिती दिली गेली. देशात आणि राज्यात कामगार, मजुर खाते कार्यरत आहे, कामगार कल्याण मंडळ, कामगार राज्य विमा योजना, लेबर कोर्ट, अनेक कामगार संघटना कार्यरत आहेत,मात्र हे. गेल्या काही वर्षांपासून कामगार, कामगार चळवळीला मारक आणि भांडवलदार धार्जिणे कायदे बदलले गेले, बनवले गेले आणि काबाडकष्ट करणाऱ्या कामगाराला बेठबिगार, गुलामाप्रमाणे, अल्प मोबदला देऊन राबविले जात आहे हे जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असल्याचा दावा करणाऱ्या भारताचे चित्र आहे. अनेक ठिकाणी किमान वेतन देखील दिले जात नाही कि कामगार कल्याण योजनांची अंमलबजावणी केली जात नाही. आजच्या घडीला ना नोकरीची शाश्वती ना भविष्याची खात्री. एकुणच कामगार दिनानिमित्त कामगार, कर्मचारी वर्गावर अन्यायच होत असल्याची सार्वत्रिक भावना निर्माण झाली आहे.

**मंगल देशा, पवित्र देशा**
**प्रणाम घ्यावा माझा**
**श्री महाराष्ट्र देशा**
**जय महाराष्ट्र..!**

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**मो. ९१५८४९५०३७**

## महाराष्ट्र माझा..

संस्कृती गीत प्रकार
महाराष्ट्राच्या अंगणी
मधाळ अंगाई गीता
ममत्वस्नेहाळ पेरणी

नट खट न् अवखळ
शृंगारिक गं लावणी
अश्लिलता कुठे नसे
लावण्यवती देखणी

शिवरायाचा पोवाडा
समशेर रे खणखणी
मना मनात आकारी
स्वराज्याची आखणी

गोडसुरवात दिसाची
वासुदेव पहाट गाणी
बळीराजाशिवारगीत
पाटातूनि वाहे पाणी

भारूड सार्थ साधनी
या समाज परिवर्तनी
बहु रूपी पथ नाट्य
लोक संस्कृती जननी

विठू राम कृष्ण दिसे
तल्लीन होता किर्तनी
वाटते ऐकावे अजूनि
अमृत गोडवा भजनी

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

# १०६ हुतात्म्यांच्या बलिदानातून साकारला संयुक्त महाराष्ट्र !

देशाला स्वातंत्र्य सहजासहजी मिळाले नाही त्यासाठी शेकडो क्रांतिकारकांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले, कित्येकांनी इंग्रजांनी दिलेल्या नरकयातना भोगल्या, कित्येक स्त्रियांनी आपली कमावती मुले देशासाठी अर्पण केली तर कित्येकांनी आपल्या सौभाग्याला देशासाठी कुर्बान केले. क्रांतिकारकांच्या अमोघ बलिदानातून साकारलेल्या या राष्ट्रात जगताना येथील सोयी सुविधा उपभोगताना त्या क्रांतिकारकांचा विसर आपल्याला पडता कामा नये. १५ ऑगस्ट १९४७ ला भारतभूमीला स्वातंत्र्य मिळाले, तरी महाराष्ट्राला स्वतंत्र ओळख मिळाली नव्हती आजचे गुजरात आणि महाराष्ट्र मिळून मुंबई राज्य त्यावेळी आस्तित्वात होते आणि या मुंबई राज्याचे मुख्यमंत्री होते मोरारजी देसाई. त्यावेळी मुंबई राज्यात मराठी आणि गुजराती भाषिकांची संख्या अधिक होती. देशाच्या स्वातंत्र्यानंतर दोन्ही भाषिकांकडून स्वतंत्र राज्याची मागणी केली जात होती. त्यासाठी लहान मोठी आंदोलने केली जात होती. देशाच्या राज्य पुनर्रचना आयोगाने मुंबई राज्याचे दोन भाग करून महाराष्ट्र आणि गुजरात अशी दोन स्वतंत्र राज्य स्थापन कारण्याचा निर्णय घेतला. राज्याला आर्थिकदृष्ट्या सबळ करू शकणारे आणि जागतिक व्यापाराच्या दृष्टीने सोयी सुविधांनी युक्त असलेले मुंबई शहर आपल्याकडे यावे अशी दोन्ही राज्यांची तीव्र इच्छा होती. मुंबई शहरात जसे मराठी बांधव मोठ्या प्रमाणात होते तसे गुजरातीही होते शिवाय एकत्रित राज्याचे मुख्यमंत्री गुजराती असल्याने त्यांनी मुंबई शहर गुजरातला जोडण्यासाठी जोर लावला. राज्य पुनर्रचना आयोगानेही मुंबई गुजरातला देण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय महाराष्ट्रातील जनतेला मान्य नव्हता अखेर मुंबई महाराष्ट्राला मिळवून देण्यासाठी पुन्हा आंदोलन पेटले. लहान मोठ्या सभा होऊ लागल्या. निषेध मोर्चे काढले गेले. विविध माध्यमानतून जनजागृती होऊ लागली.

मुंबई गुजरातच्या घशात घालू पाहणाऱ्या सरकारचा निषेध करण्यासाठी एक विशाल मोर्चा काढण्याचे ठरले, त्यासाठी दिवस ठरला २१ नोव्हेंबर इ.स.१९५६ चा. मोर्च्यासाठी एकत्रित जमण्याचे स्थळ ठरले फ्लोरा फाउंटन म्हणजेच आताचे हुतात्मा चौक. सकाळपासूनच येथे आंदोलक जमू लागले. हळूहळू परिसरात गर्दी वाढू लागली. आंदोलकांचा एक विशाल समूह चर्चगेट स्थानकापासून तर एक मोठा समूह तेव्हाच्या बोरीबंदर स्थानकापासून फ्लोरा फाउंटनच्या दिशेने येऊ लागला. गगनभेदी घोषणांनी सारा परिसर दुमदुमू लागला. थोड्याच वेळात आंदोलकांचा महासागर या परिसरात निर्माण झाला. सरकारला या मोर्च्याची आधीच कल्पना असल्याने परिसरात पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. मराठी जनतेची वाढती एकजूट फोडण्याच्या दृष्टीने तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी मोर्चावर लाठीचार्ज करण्याचे आदेश देऊन लोकांना पांगवण्याचा प्रयत्न केला मात्र पाच पातशाह्यांना नेस्तनाबूत करून पुरून उरलेला कडवा मराठा मागे हटण्यास तयार नव्हता. पोलिसांचे प्रयत्न अयशस्वी झाले. सरकारच्या दडपशाहीमुळे आंदोलक अधिकच आक्रमक झाले. आंदोलकांची आक्रमकता पाहून मुख्यमंत्री देसाई यांनी आंदोलकांवर गोळीबार करण्याचे आदेश दिले. त्याच क्षणी जोरदार फायरिंग झाली. युद्धभूमीप्रमाणे बेछूट गोळीबाराच्या आवाजाने संपूर्ण परिसर दणाणून गेला. आंदोलकांच्या हृदय पिळवटून टाकणाऱ्या किंकाळ्यांनीही मुख्यमंत्र्यांच्या हृदयाला पाझर फुटला नाही. परिसरात सर्वत्र रक्ताचा सडा पसरला. स्वतंत्र भारतात इंग्रजांसम अत्याचार येथील मराठी जनतेवर करण्यात आले. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनासाठी करण्यात आलेल्या या आंदोलनात १०६ आंदोलक हुतात्मे झाले. तेव्हापासून या परिसराला हुतात्मा चौक असे नाव पडले. हुतात्म्यांच्या बलिदानापुढे आणि मराठी माणसाच्या आक्रमकतेपुढे सरकारने अखेर नमते घेऊन १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना केली. महाराष्ट्राला मुंबई जोडून घेण्यासाठी त्यावेळी १०६ बांधवानी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. १ मे महाराष्ट्र दिनाची सुट्टी उपभोगताना या हुतात्म्यांचा विसर आपल्याला पडता कामा नये !

मराठी माणसाच्या बलिदानातून साकारलेल्या संयुक्त महाराष्ट्रात मुंबई समाविष्ट झाल्यानंतर महाराष्ट्राने मुंबईला समृद्ध केले, श्रीमंत केले. आजमितीला मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी बनली आहे. देशाला सर्वाधिक अर्थपुरवठा मुंबईकडून केला जातो. कोट्यवधी नागरिकांचा चरितार्थ आज मुंबई चालवते आहे. देशभरातील बेरोजगार मुंबईत येऊन आज आपला संसार थाटत आहेत. मुंबईने आजतागायत सर्वांना आपलेसे केले आहे. त्यावेळी जसा मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचा कुटील डाव रचला गेला तसे प्रयत्नही आजही अधूनमधून सुरु आहेत. सरकारच्या नाकर्तेपणामुळे म्हणा किंवा आपल्यातील स्वाभिमानाच्या अभावामुळे म्हणा गेल्या काही वर्षांत राज्यात आलेले अनेक उद्योगधंदे गुजरातला पळवण्यात आले. मुंबईतील मराठी टक्का आज झपाट्याने घसरतो आहे. मुंबईत वर्षागणिक उभ्या राहणाऱ्या टोलेजंग इमारतींमध्ये राहायला येणाऱ्या मराठी माणसांचे प्रमाण अगदीच नगण्य आहे. मुंबईची लाईफ लाईन म्हणवल्या जाणाऱ्या लोकल ट्रेनमध्ये आज मराठी भाषिकांच्या बरोबरीने इतर भाषिकही तेव्हढ्याच प्रमाणात दिसून येतात. येथील उद्योगधंद्यांमध्ये मराठी माणूस अगदी नावाला उरला आहे. वर्षोनुवर्षे राहत असलेली मुंबईतील घरे परप्रांतीयांना विकून मराठी माणूस मुंबईबाहेर स्वस्तात घर घेऊन व्याजाच्या पैशांवर खुशाल जिंदगी जगू लागला आहे. हे असेच चालत राहिले तर भविष्यात मुंबई महाराष्ट्रात राहील का ? हिंदू हृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे म्हणायचे, 'मुंबई मराठी माणसाची आहे आणि मुंबईत आवाजही मराठी माणसाचाच असायला हवा' मात्र हा आवाजच आज हरवत चालला आहे. मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी होऊ नये यासाठी आपल्या १०६ मराठी बांधवांनी प्राणाचे बलिदान दिले आहे, मात्र या बलिदानाचे मोल आजच्या मराठी माणसाला तितकेसे न राहिल्याने तो पैशाच्या हव्यासापोटी मुंबईबाहेर जाऊ लागला आहे. हे कुठेतरी थांबायला हवे. त्यासाठी पुन्हा एकदा मराठी माणसांनी संघटित व्हायला हवे !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# राजकीय दबावातून निलेश लंकेच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्याचे षडयंत्र, काँग्रेसचा आरोप

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, अहमदनगर :** कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये रात्री उशिरा हाय व्होल्टेज नाट्य पाहायला मिळाले असून महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांच्या कार्यकर्त्यांवर शहरातील एका खाजगी हॉटेलवर धाड मारून त्यांना ताब्यात घेण्यात आले होते त्यानंतर हा प्रकार घडला. सदर घटना समजताच शहर काँग्रेस जिल्हाध्यक्ष किरण काळे यांच्यासह काँग्रेस कार्यकर्त्यांनी कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये गर्दी केली आणि त्यावेळी शहराचे डीवायएसपी अमोल भारती आणि किरण काळे यांच्यामध्ये जोरदार शाब्दिक चकमक उडाली. अमोल भारती यांनी काळे यांना अटक करा असे फर्मान सोडले त्यानंतर काँग्रेस कार्यकर्ते संतापले तसेच काळे यांनी कोतवाली पोलीस निरीक्षकांच्या दालनातच जमिनीवर बैठक मांडून मी कोणताही गुन्हा केलेला नाही पण खोटा गुन्हा दाखल करून जर मला अटक करायची असेल तर मी त्या संघर्षाला सामोरे जायला तयार आहे मात्र हे हुकूमशाही वागणे संविधान विरोधी आहे. हा सत्तेचा गैरवापर आहे. आम्ही त्याचा




निषेध करतो असे म्हणत डीवायएसपी भारती यांना चांगलेच धारेवर धरले होते. निलेश लंके यांनी यापूर्वीच शेवगाव येथील सभेत बोलताना पोलिसांकडून कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत त्यांना नाहक त्रास देण्याचे उद्योग सध्या सुरू आहेत असे म्हटलेले होते. आम्ही एखाद्या हॉटेलवर थांबलो तर दुसऱ्याच दिवशी त्या हॉटेलवर रेड करून कारवाई करण्यात येते. ४ जूनपर्यंत थांबा सगळा हिशोब होईल असा देखील इशारा निलेश लंके यांनी यावेळी दिलेला होता. महसूल मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या सांगण्यावरून असे प्रकार केले जात असल्याचा आरोप महाविकास आघाडीकडून अनेकदा करण्यात आलेला आहे.

# आम आदमी पार्टी प्रचाराच्या मैदानात...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, पुणे :** आप जेल का जवाब वोट से केजरीवालांना खोट्या गुन्ह्यामध्ये कुठलाही पुरावा सादर न करता अनेक दिवसापासून तिहार जेलमध्ये ठेवण्यात आले आहे. आम आदमी पार्टीने इंडिया फ्रंट महाराष्ट्र मध्ये महाविकास आघाडीला पाठिंबा देण्यात आला आहे.

त्याचेच अवचित साधून बारामती लोकसभेचे उमेदवार सुप्रिया सुळे यांचा प्रचार करण्यासाठी आम आदमी पार्टी घरोघरी जाऊन पत्रक वाटणे कोपरा सभा घेणे प्रशांत कांबळे शहराध्यक्ष अनुसूचित जाती यांच्या मार्गदर्शनाखाली हनुमान नगर, सच्चाई माता परिसर आंबेगाव खुर्द या भागामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये कार्यकर्ते नागरिक मिळून संपूर्ण परिसरामध्ये जनजागृती करण्यात आली त्याचबरोबर मतदान करण्याचे सुद्धा आव्हान करण्यात आले.

कोपरा सभेमध्ये बोलत असताना प्रशांत कांबळे यांनी ही लढाई अस्तित्वाची आहे. हुकूमशाही घालून लोकशाही बळकट करायचे आहे. त्यासाठी प्रत्येकाने मतदान केले पाहिजे ज्या पद्धतीमध्ये बीजेपी सरकार मोदी, शहा यांची हुकूमशाही या भारतामध्ये चालू आहे. शाळा, कॉलेज सरकारी प्रायव्हेट करण्याचं काम या सरकारने दहा वर्षात केले आहे. ईडी,



सीबीआयचा गैर वापर शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव मिळत नाही. दहा वर्षात सर्वाधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. मराठा समाजाला त्यांच्या हक्काचा आरक्षण मिळाला नाही.

अनेक मराठी बांधवांनी आरक्षणासाठी आत्महत्या केली इलेक्ट्रॉन बॉण्डच्या माध्यमातून बीजेपी महाघोटाळा करताना दिसत आहे. खोट्या जाहिरातीच्या माध्यमातून संपूर्ण देशाला भ्रमित करण्याचे काम हे सरकार करत आहे. भारताचा दुश्मन पाकिस्तान यांच्याकडून सुद्धा इलेक्ट्रॉन बॉण्डच्या माध्यमातून पैसे घेतले आहेत. असा घनगती आरोप सभेच्या माध्यमातून केला. त्यावेळेस सागर पाटील प्रदेश सहसचिव पुणे शहराध्यक्ष सुदर्शन जगदाळे, धनंजय बेनकर महासचिव अक्षय शिंदे, सतीश यादव उपाध्यक्ष अनिल कोंढाळकर क्रीडा उपाध्यक्ष नौशाद अन्सारी युवा उपाध्यक्ष निखिल खंदारे,ऍड.गजानन थरकुडे, भगत सिंग, गजानन भोसले, किरण कद्रे, लक्ष्मण केतन, संतोष शेंबडे,प्रकाश कुंभार, नरेंद्र पारखे, प्रीतम कोंढाळकर,बालाजी कंठेकर, शुभम बिराजदार, ऍड. वैभव जोशी,संतोष थोरात, सुवर्ण धंडे, दिपाली शेंबडे, सारिका केकान पूजा फलके स्वाती कांबळे गयाबाई जाधव सारिका सिंग दिपाली धंडे,सुनील चव्हाण महादेव चांदणे प्रवीण मिसाळ संभाजी नेटके विजय केगाळ आप्पा रणदिवे दत्ता काकरे बालाजी सामोसे यदी नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवार वैशाली दरेकर यांनी दाखल केला उमेदवारी अर्ज



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.३०, डोंबिवली :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या उमेदवार वैशाली दरेकर यांनी आज ३० रोजी आपला अर्ज दाखल केला यावेळी महाविकास आघाडीचे शिवसेना नेते आदित्य ठाकरे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ( शरद पवार गट) आमदार जितेंद्र आव्हाड , काँग्रेस आय जिल्हाध्यक्ष सचिन पोटे , आम आदमी पक्षाचे जिल्हा अध्यक्ष धनंजय जोगदंड, आरपीआय धर्मा वक्ते व आदी मान्यवर व पदाधिकारी उपस्तिथ होते. यावेळी पत्रकारांशी बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले भाजपने पक्ष फोडफोडीच राजकारण चालू केल आहे हे आपण पाहिले आहे , आमच्या मागे जनता आहे. महाराष्ट्रातून उद्योग बाहेर का जात आहेत ? कृषिशेत्रात आपण मागे का ? महाराष्ट्राचा विकास दोन वर्षा पासून मागे का ? जर आता बोलो नाही तर हे मंत्रालय ही गुजरातला नेतील. देशात निवडणूक आयोग आहे का ? असे प्रश्न आदित्य ठाकरेंनी उपस्तित केले.

# 'महाराष्ट्र दिन' निमित्त जाणून घ्या या दिनाचा इतिहास आणि महत्त्व !

**भारतात दरवर्षी १ मे रोजी महाराष्ट्र दिन आणि गुजरात दिन साजरा केला जातो. यासोबतच १ मे रोजी आंतरराष्ट्रीय कामगार दिनही साजरा केला जातो. १९६० मध्ये महाराष्ट्र आणि गुजरातची स्वतंत्र राज्ये म्हणून स्थापना झाली.**

ही दोन राज्ये वेगळी झाली तेव्हा त्यांच्यात मुंबईबाबत वाद झाला. पण मुंबई महाराष्ट्राशी जोडली गेली पाहिजे, अशी मराठी माणसांची मागणी होती, कारण तेथील बहुतांश लोक मराठी बोलतात.

त्यावेळी १ नोव्हेंबर १९५६ रोजी राज्य पुनर्रचना कायदा १९५६ अंतर्गत मुंबई महाराष्ट्राशी जोडण्यात आली. बॉम्बे पुनर्रचना कायदा १९६० नुसार, द्विभाषिक मुंबई राज्य मराठी भाषिक लोकांसाठी महाराष्ट्र आणि गुजराती भाषिक लोकांसाठी गुजरात अशा दोन स्वतंत्र राज्यांमध्ये विभागले गेले. हा कायदा १ मे १९६० रोजी आंतरराष्ट्रीय कामगार दिनाच्या दिवशी लागू झाला.

मुंबई, राज्याची राजधानी, भारताची आर्थिक राजधानी म्हणून ओळखली जाते आणि मोठ्या कॉर्पोरेट आणि वित्तीय संस्थांचे मुख्यालय आहे. महाराष्ट्र हे देशातील ऑटोमोबाईल उत्पादन आणि इञ्ञ्ख हब आहे.

महाराष्ट्राची राजधानी मुंबई ही मायानगरी म्हणून ओळखली जाते. फिल्म सिटी असण्याबरोबरच याला औद्योगिक शहर असेही म्हणतात. महाराष्ट्र आपल्या संस्कृतीसाठी जगात प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रात अनेक मंदिरे, किल्ले, जुनी वास्तू आणि कला आहेत. येथील प्रत्येक किल्ला मराठा साम्राज्याच्या वैभवशाली इतिहासाची कहाणी सांगतो. महाराष्ट्रातील किल्ले लष्करी विजयाचे प्रतीक म्हणून ओळखले जातात. हे सर्व किल्ले छत्रपती शिवाजी यांच्याशी संबंधित आहेत, जे भारतीय इतिहासातील सर्वात शक्तिशाली आणि महान राजे होते.

भारताच्या पश्चिम भागात वसलेले, महाराष्ट्र हे क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारतातील तिसरे आणि लोकसंख्येच्या दृष्टीने दुसरे मोठे राज्य आहे. २०११ पर्यंत एकूण ११२.४ दशलक्ष लोकसंख्येसह महाराष्ट्र ३०८,००० चौरस किमीमध्ये पसरलेला आहे. महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड, आंध्र प्रदेश, कर्नाटक, गोवा आणि दादरा-नगर हवेली ही सीमारेषेने जोडलेली आहेत. महाराष्ट्राची राजधानी मुंबई हे जगातील सहाव्या क्रमांकाचे महानगर आहे. मुंबई हे भारतातील सर्वात मोठे आणि सर्वाधिक लोकसंख्या असलेले शहर आहे.

**महाराष्ट्राविषयी माहिती**

**१)** भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट्र ७२० किलोमीटरमध्ये पसरलेला आहे. भारताच्या त्ड्ढ मध्ये एकट्या महाराष्ट्राचा वाटा १५% पेक्षा जास्त आहे, भारताच्या निर्यातीत २०% पेक्षा जास्त. गेल्या दोन दशकांत भारतातील जवळपास ३०% एफडीआय गुंतवणूक महाराष्ट्रातून आली आहे.

**२)** इतर भारतीय राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात सर्वाधिक (६) युनेस्को जागतिक वारसा स्थळे आहेत.

**३)** भारतात सुमारे १२०० लेणी आहेत, त्यापैकी महाराष्ट्रात ८०० लेणी आहेत. यातील काही लेणी सुमारे १५०० ते २२०० वर्षांपूर्वी कोरलेली आहेत.

**४)** महाराष्ट्रात सर्वाधिक ४५० किल्ले आहेत. महाराष्ट्रात ४९ आश्चर्यकारक वन्यजीव अभयारण्ये, सहा राष्ट्रीय उद्याने आणि सात संवर्धन राखीव आहेत.

**५)** स्वातंत्र्योत्तर बॉम्बे राज्य मुख्यत्वे समुद्रकिनारी होते आणि त्यात मराठी आणि गुजराती भाषिक भागांचा समावेश होता.

१९५६ च्या राज्य पुनर्रचना कायद्यांतर्गत सौराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा जोडून त्याचा विस्तार करण्यात आला. ज्याने भाषेच्या धर्तीवर भारतातील विद्यमान राज्ये आणि संस्थानांची पुनर्रचना केली.

**६)** आजचे महाराष्ट्र आणि गुजरात एकत्र करून नवीन मुंबई राज्य १ नोव्हेंबर १९५६ रोजी अस्तित्वात आले. १९५६ च्या पुनर्रचनेमुळे दोन चळवळींचा उदय झाला - संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि महागुजरात चळवळ. या आंदोलनांनंतर मराठी भाषिकांसाठी महाराष्ट्र आणि गुजराती भाषिकांसाठी गुजरात राज्याची निर्मिती झाली.

**७)** दोन्ही राज्ये अधिकृतपणे १ मे १९६० रोजी मुंबई पुनर्रचना कायदा १९६० च्या परिणामी अस्तित्वात आली. त्यामुळे हा केवळ महाराष्ट्र दिनच नाही तर गुजरातमध्ये गुजरात दिन म्हणूनही साजरा केला जातो.

**८)** मुंबई राज्याची राजधानी आणि भारताची व्यापारी राजधानी म्हणून विकसित झाली. हे शहर अनेक जागतिक बँकिंग आणि वित्तीय सेवांसाठी ओळखले जाते. महाराष्ट्र हे शिक्षणासाठी आयटी आणि आयटीईएस, इलेक्ट्रॉनिक्स आणि कॅप्टिव्ह बिझनेस आउटसोर्सिंग उद्योगांचे केंद्र बनले.

**९)** राज्यात सामाजिक, भौतिक आणि औद्योगिक पायाभूत सुविधा चांगल्या प्रकारे विकसित आहेत. १६ विमानतळांव्यतिरिक्त राज्यात दोन मोठी आणि ४८ छोटी बंदरे आहेत. डिपार्टमेंट फॉर प्रमोशन ऑफ इंडस्ट्री अँड इंटरनल ट्रेड नुसार, ऑक्टोबर २०१९ ते मार्च २०२१ दरम्यान, महाराष्ट्रात एफडीआयचा प्रवाह ण्ड २३,४३२.३५ दशलक्ष इतका होता.

**१०)** मराठी वारसा आणि अभिमान जपण्यासाठी राज्यभरातील लोक महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करतात. या दिवशी राज्यात सुट्टी असते.

**- ॲड.पियुष लहू चौधरी**
**नागपूर.**

# राहुड घाटात एसटी आणि ट्रकचा भीषण अपघात चार जणांचा मृत्यू तर नऊ गंभीर

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.३०, विंचूर (नाशिक) :** चांदवड -मुंबई -आग्रा महामार्गावर सकाळी ९:३० वा. वसई ते जळगाव बस आणि ट्रकचा चांदवडच्या राहुड घाटात भीषण अपघात झाला असून, या बस मध्ये साधारण ५० प्रवासी होते. अपघातात जवळपास चार प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला असल्याची माहिती गिरीश महाजन यांनी दिली. आणि गिरीश महाजन यांनी चांदवडला घटनास्थळी भेट देऊन मृतांना दहा लाख रुपये तर जखमींना पाच लाख रुपयाची मदत जाहीर केली. तर २७ जण जखमी झाले असून, त्यापैकी नऊ प्रवाशी गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. मृतांमध्ये अकडा वाढण्याची भीती




वर्तविण्यात येत आहे. जखमींना चांदवड येथील उपजिल्हा रुग्णालयात व खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, डेप्युटी कलेक्टर, चांदवड तहसीलदार आणि सहा.पोलीस निरीक्षक घटनास्थळी दाखल झाले होते, तातडीने मदत कार्य सुरू झाल होते. अपघातामुळे मुंबई आग्रा महामार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक ठप्प झाली होती.

# वारणवाडी येथे दिवसाढवळ्या दरोडा, दरोडेखोर लाखोंचा ऐवज घेऊन पसार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०,पारनेर (अ.नगर) :** तालुक्यातील वारणवाडी येथे दिवसा ढवळ्या बंद घरावर दरोडा टाकत ११ लाख ७९ हजार रुपयांच्या ३५ तोळ्याच्या सोन्या- चांदीच्या दागिन्यावर दरोडेखोरांनी डल्ला मारला असल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी स्वप्निल पांडुरंग काशिद (वय ३६ वर्षे, धंदा हॉटेल व्यवसाय, रा. वारणवाडी, ता. पारनेर) यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी काशिद शेतीसोबत खडकवाडीत हॉटेल व्यवसाय करतात. दि. २९ एप्रिल रोजी नेहमीप्रमाणे ते हॉटेलवर गेले होते. तसेच कटूंबातील सदस्य शेती कामासाठी शेतात गेले होते. संध्याकाळी ७ वाजता कटूंबातील सदस्य परतले असतांना घराचे कुलूप तोंडून घरातील सामान उचकापाचक करुन अस्ताव्यस्त पडलेले दिसून आले. लोखंडी कपाटाचा दरवाजा तोडून १८ तोळे वजनाची गळ्यातील साखळी, १२ तोळे वजनाचे सोन्याचे गंठण, १२ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, १० ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, १० ग्रॅम वजनाची सोन्याची कानातील फुले, ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी असा ११ लाख ७९ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याचे समोर आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून पुढील तपास पोलीस करत आहे. नागरिकांनी दिवसा किंवा रात्री आपल्या मौल्यवान वस्तू जवळ न बाळगता बँक लॉकरमध्ये किंवा अन्य सुरक्षित ठिकाणी ठेवाव्यात असे आवाहन पारनेर पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.

**तालुक्यात चार दिवसात दोन घटना...**

बंद घर हे चोरट्यांनी लक्ष केले असून चार दिवसांपूर्वी नगर कल्याण महामार्गावरील टाकळीढोकेश्वर येथील ढुस वस्तीवरील बंद घराचे कुलूप तोडत साडेतीन तोळ्याचे दागिने लंपास केल्याची घटना घडली. तर सोमवारी वारणवाडी येथील काशीद कुटुंबियांच्या घराचे कुलूप तोडून ३५ तोळे दागिने लंपास केले असल्याची दुसरी घटना घडली. दरम्यान या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले आहे. पोलिसांनी अशा वृत्तीच्या गुन्हेगारांचा तपास लावून गुन्हेगारीचा बिमोड करावा अशी मागणी व्यक्त होत आहे.

# मतदानासाठी १२ प्रकारचे ओळखपत्र ग्राह्य

**अक्षराज : संगिता वनकळस**

**दि.३०, कळंब (धाराशिव) :** येत्या ७ मे रोजी धाराशिव लोकसभा मतदारसंघासाठी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. मतदानाप्रसंगी ओळखीचा पुरावा म्हणून मतदारांना छायाचित्र मतदान ओळखपत्र सोबत बाळगणे आवश्यक आहे.ज्या मतदाराकडे हे ओळखपत्र नसतील अशा मतदारांना भारत निवडणूक आयोगाने जाहीर केल्याप्रमाणे विविध १२ प्रकारच्या ओळखपत्रांपैकी कोणतेही एक ओळखपत्र दाखवून मतदान करता येईल. भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीकरीता ज्या मतदारांना छायाचित्रासह मतदार ओळखपत्र दिलेले आहे,त्या मतदारांनी मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करावे.जे मतदार छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करु शकणार नाही,अशा मतदारांना त्यांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्राच्या व्यतिरिक्त पुढील कागदपत्रे पुरावा म्हणून सादर करता येतील.

# नाशिक जिल्ह्यातील ग्रामपंचायतीची ८६ कोटी ७० लाख रुपये घरपट्टी वसूल..

**अक्षराज : निवृत्ती शिंदे**

**दि.३०, नाशिक :** जिल्ह्यात १३८९ ग्रामपंचायती असून, त्यांना ३१ मार्च २०२४ अखेरपर्यंत १०७ कोटी रुपये घरपट्टी वसुलीचे उद्दिष्ट होते. त्यापैकी या ग्रामपंचायतींनी ८०.०७ टक्के म्हणजे ८६ कोटी ७० लाख रुपये घरपट्टी वसुली झाली आहे. कळवण व दिंडोरी या आदिवासी बहुल तालुक्यांमधील ग्रामपंचायतींची सर्वाधिक घरपट्टी वसुली झाली असून, देवळा व सिन्नर हे तालुके सर्वाधिक पिछाडीवर आहेत.पंचायत राज्य व्यवस्थेतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या त्रीस्तरीय रचनेच ग्रामपंचायत हा सर्वात छोटा घटक आहे. ग्रामपंचायत क्षेत्रातील विकासकामांसाठी सरकारकडून वित्त आयोग, ग्रामविकास विभाग यांच्याकडून निधी दिला जात असला, तरी ग्रामपंचायतीलाही घरपट्टीच्या माध्यमातून स्वउत्पन्न मिळत असते. ग्रामपंचायत पातळीवर घरपट्टी, पाणीपट्टीची वसुली करण्यासाठी १९६२ मध्ये ग्रामसचिवांची नेमणूक केली गेली. घरपट्टी करातून गावातील सार्वजनिक विकासाची कामे ग्रामपंचायतींच्या माध्यमातून केली जातात. गावातील नागरिकांकडून घरपट्टी तसेच इतर घटकांतून ग्रामपंचायत कर आकारणी स्वरूपात रक्कम वसूल केली जाते. त्यातून ग्रामपंचायतींचा खर्च भागवण्यात येतो. वर्षानूवर्षे थकीत ठेवलेले ग्रामपंचायतींचे कर भरण्यासाठी विविध मार्गाने नागरिकांमध्ये जागृती करण्यात येते. जिल्ह्यात १५ तालुक्यांमध्ये १ हजार ३८९ ग्रामपंचायती आहेत. या ग्रामपंचायतींना ३१ मार्च अखेर १०७ कोटी रुपये घरपट्टी वसुलीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. यापैकी मार्च अखेरपर्यंत ८६ कोटी ७० लाख ४२ हजार रुपयांची वसुली झाली आहे. आदिवासी तालुके असलेल्या दिंडोरी व कळवण तालुक्यात सर्वाधिक (अनुक्रमे १२.४४ कोटी व २.१८ कोटी) घरपट्टी वसुली करण्यात ग्रामपंचायतींना यश आले आहे.

तसेच बागलाण येथे ६.४१ कोटी, तर सुरगाणा येथे २.१६ कोटी रुपयांची वसुली झाली आहे. सिन्नर तालुक्यांतून १२.८७ कोटींची वसुली अपेक्षित असताना ९.५१ कोटींची वसुली झाली.

# शरीरातील उष्णता कमी करण्यासाठी कांदा कसा ठरतो फायदेशीर ?



**सध्या उन्हाळा सुरु झाला आहे. तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत आहे. अशात अनेकांना वाढत्या उष्णतेमुळे शारीरिक थकवा आणि शरीरात पाण्याची कम तरता जाणवत आहे.**

यामुळे उष्माघातच नव्हे तर हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधित आजारांचा धोकासुद्धा वाढू शकतो. त्यामुळे आधीच हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधित आजार असलेल्या लोकांनी काळजी घेणे आवश्यक आहे. अति उष्णतेम ुळे थकवा,चिडचिड आणि मानसिक आरोग्यावरही याचा दुष्परिणाम दिसून येतो. ही उष्णता कमी करण्यासाठी उन्हाळ्यात सॅलेड आणि जेवणामध्ये तुम्ही कांद्याचा वापर करू शकता.

**कांद्याचे फायदे :** अनेकांना जेवण करताना तोंडी कच्चा कांदा खाण्याची सवय असते. तर काहींना कच्चा कांदा जेवणासोबत लागतोच. मात्र, कच्चा कांदा खावा की नाही असा अनेक जणांना पडलेला प्रश्न आहे. कांदा केवळ जेवणातच नाही तर आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे. कांद्याचा रस आणि कच्चा कांद्याचे अनेक फायदे होतात. बहुतेक घरांमध्ये कांद्याचा वापर स्वयंपाकात केला जातो, एवढेच नाही तर लोक कच्च्या कांद्याची कोशिंबीरही जेवणासोबत खातात.

सर्व प्रकारचे अन्न जसे आपल्या शरीरासाठी आवश्यक आहे, तसेच कांदा आरोग्यासाठीही उपयुक्त मानला जातो. खरे तर कांद्यात सल्फर मुबलक प्रमाणात असते. त्यामुळे उन्हाळ्यातही उष्णता टाळण्यासाठी कच्च्या कांद्याचे सेवन करण्याचा सल्ला दिला जातो.

कांदा शिजवल्याने त्यांची चव चांगली होतेच पण त्याचा पूर्ण फायदा हा कच्च्या कांद्यापासूनच मिळतो. यात अँटीऑक्सिडंट्स असतात, जे संपूर्ण आरोग्यास प्रोत्साहित करण्यास मदत करतात. सोडियम, फोलेट, पोटॅशियम, व्हिटॅमिन सी, कॅल्शियम, फॉस्फरस आणि मॅग्नेशियम यांसारखे अनेक पोषक घटक कांद्यामध्ये आढळतात.

**शरीरातील उष्णता कमी करण्यासाठी कांदे कशी मदत करतात...?**

कांदा हा नैसर्गिकरित्या थंड असतो. त्यामुळे उन्हाळ्यात आहारामध्ये याचा समावेश महत्त्वाचा मानला जातो. कांद्यामध्ये असलेले पाणी शरीरातील पाण्याची कमतरता दूर करतात. याशिवाय यात सोडियम आणि पोटॅशियमची मात्रा अधिक असते, जे शरीरातील इलेक्ट्रोलाइट संतुलन राखण्यास मदत करतात. यामध्ये खनिजे आणि जीवनसत्त्वे विशेषत: व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असतात. या घटकांमुळे शरीराला पोषक घटक मिळतात आणि आपली रोग प्रतिकार शक्तीसुद्धा वाढते.

❊ कांद्यामध्ये क्वेर्सेटिन आणि सल्फर सारखे पदार्थ असतात, जे शरीरातील घाम शोषून घेऊन शरीराला थंड करतात आणि उष्णता कमी करतात. क्वेर्सेटिन हिस्टामाइन्सला दूर पळवते. हिस्टामाइन्स या रसायनाम ुळे उष्णतेपासून आपल्याला ॲलर्जी होऊ शकते.

❊ कांदा पचनक्रियेशी संबंधित एन्झाइम्स सक्रिय करतात आणि त्यामुळे पचनक्रिया सुधारते. कांदा हा फायबर आणि प्रीबायोटिक्सचा चांगला स्त्रोत आहे, जे आतड्यांमधील बॅक्टेरियाला पोषक तत्वे पुरवतात. या बॅक्टेरियांमुळे फॅटी ॲसिड तयार होते, जे पचनक्रियेसाठी फायदेशीर आहे.

❊ कांद्यामधील क्रोमियम रक्तातील साखरेला नियंत्रित ठेवते. कांद्यामुळे वारंवार वॉशरूम लागते, ज्यामुळे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास म दत होते. एका अभ्यासात सांगितल्याप्रमाणे कांद्याच्या अर्काच्या सिस्टीन सल्फोक्सिड या गोळ्या घेतल्यामुळे झोप सुधारते.

**नियमित आहारात कांद्याचा समावेश कसा करावा...?**

– उन्हाळ्यात कांद्याचा समावेश सॅलेड आणि कोल्ड सूपमध्ये करू शकता. चांगल्या चवीसह तुम्ही पौष्टिक आहार घेऊ शकता.

– दररोज जेवणात कांद्याचा समावेश करा. सॅंलेड्स, सँडविच आणि इतर पदार्थांमध्ये कांद्याचा समावेश करा.

– शरीरात पाण्याची पातळी राखण्यासाठी काकडी आणि टरबूज यांसारख्या पाणीयुक्त पदार्थांसह कांद्याचे सेवन करा.

– जेवण करताना तोंडी लावण्यासाठी ताटामध्ये कांद्याचे काप घ्या.

# लिंगनकेरुर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**अक्षराज : अब्दुल.मुबिन**

**दि.२९, देगलूर (नादेड) :** ज्ञानाचा अथांग सागर, विश्वभूषण,भारतरत्न,म हानायक, अर्थशास्त्रीय, महान इतिहासकार, संविधान निर्माता, क्रांतीसुर्य, युगपुरुष, भारतीय घटनेचे शिल्पकार, परमपूज्य बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती सोहळा भीमगर्जना मित्र मंडळाच्या वतीने भीम जयंती लिंगणकेरूर येथे उत्सवात साजरी करण्यात आली.२८ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता स्वराज्य निर्माते छत्रपती शिवाजी महाराज, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास सरपंच बालाजी पाटील कदम व मार्गदर्शक राजाराम कांबळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे नर्सिंग पाटील,दत्ता नावाडे,माधव जाधव, हनमंत चव्हाण, संजय माने, संभाजी वाघमारे, गंगाधर कदम, कपिल पांडवे, मारुती बजीरे,मारुती कांबळे, जयंती मंडळाचे अध्यक्ष सुनील कांबळे, उपाध्यक्ष यादव ठावरे, सचिव सतीश कांबळे, सहसचिव नागेश कांबळे, कोषाध्यक्ष सुमित कांबळे, यांच्यासह अनेक बहुजन समाजातील कार्यकर्ते उपस्थित होते.

सायंकाळी पाच वाजता लिंगणकेरूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात आली या मिरवणुकीमध्ये मार्गदर्शक राजाराम कांबळे यांची चिमुकली भीमकन्या प्राची(पायल) लाठी–काठी फिरवून मिरवणुकीची शोभा वाढविली जयंतीनिमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीच्या अनुषंगाने कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस कॉन्स्टेबल राजूरकर संभाजी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलं.

# वडगावात नेते जोमात..कार्यकर्ते कोमात...

**अक्षराज : राहुल शिंदे**

**दि.३०, पेठ वडगांव :** वडगाव शहरात एका उमेदवाराच्या प्रचारासाठी सहभागी असलेल्या एका गटाच्या प्रम ुख मंडळी च्या वरिष्ठांकडून वाटाघाटी यशस्वी झाल्या आहेत. कामासाठी मलई पदरात पडल्याने ही मंडळी उत्साही झाली आहेत. तर कार्यकर्त्यांची नाराजी वाढली आहे. यामुळे पुढारी तुपाशी.. तर कार्यकर्ते उपाशी अवस्था त्या बाजूला झाली आहे. एकमेकांना पाण्यात बघणारे नेते मलई साठी नेहमीच तातडीने एकत्र येतात हा इतिहास आहे. कार्यकर्त्यांना भावनिक करणे व काम काढून घेण्यात पुढाऱ्यांचा हातखंडा जुना आहे.या



निवडणुकीत या गटाचे बहुतांशी कार्यकर्ते विरोधी उमेदवारांच्या प्रचारात अगोदरच आघाडीवर आहेत. अशा स्थितीत शिल्लक कार्यकर्ते एकत्र ठेवण्यासाठी त्यांना धडपड करावी लागत आहे. यावेळी नेते सांगतील ते ऐकण्याच्या म नस्थितीत कार्यकर्ते नसल्याचे चित्र आहे.

# पाणी सोडा अन्यथा जनआंदोलन आ.प्राजक्त तनपुरे यांचा इशारा

**अक्षराज : सत्यम भोसले**

**दि.३०, राहुरी (अ.नगर) :** निळवंडे धरणातून उजव्या कालव्यातून राहुरी तालुक्याच्या वाट्याचे शिल्लक असलेले १ टीएमसी पाणी १ मे पर्यंत न सोडल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा आ. प्राजक्त तनपुरे यांनी दिला आहे.

निळवंडे धरणामधून निळवंडे उजव्या कालव्याला पाणी सोडण्याचा निर्णय कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत होऊन सदर पाणी कालव्याची कामे पूर्ण होऊन २५ एप्रिल २०२४ रोजी सोडण्यात येईल असे सांगूनही सदर पाणी आज २८ तारखेपर्यंत सोडण्यात न आल्याने काल सकाळी निळवंडे उजव्या कालव्याचे लाभधारक शेतकरी आक्रमक होऊन तहसील कार्यालयात आले होते. यावेळी माजी राज्यमंत्री आ. प्राजक्त तनपुरे यांनी प्रथम तहसीलदार नामदेव पाटील यांच्याशी चर्चा करीत शेतकऱ्यांनी आपली गाऱ्हाणी मांडली.

यावेळी तहसीलदार पाटील यांनी निळवंडे धरणाचे कार्यकारी अभियंता हापसे यांचेशी मोबाईलवर चर्चा केली. यावेळी आमदार तनपुरे यांना व्यवस्थित उत्तरे न दिल्याने त्यांनी निळवंडे धरणाचे अधीक्षक अभियंता शेटे यांच्याशी चर्चा करून कालवा सल्लागार समितीमध्ये पालकमंत्री यांच्या बरोबर झालेला निर्णय दोन्ही अधिकाऱ्यांनी सांगूनही त्याबाबत कुठलीही कार्यवाही केली



नाही. तालुक्याच्या उत्तरेतील भागासाठी लाभदायक समजल्या जाणाऱ्या निळवंडे उजव्या कालव्यासाठी १.५ टीएमसी पाणी राखीव करण्यात आले होते. पैकी अर्धा टीएमसी पाणी हे चाचणीसाठी यापूर्वी सोडण्यात आले होते व कालव्यांचे लिकेज चेक करण्यात आले होते.

उर्वरित १ टीएमसी पाणी सोडण्याचा निर्णय कालवा सल्लागार समितीने घेतला असून देखील अद्याप पाणी सुटत नसल्याने यामागे काही राजकीय षडयंत्र असल्याचा संशय आ. तनपुरेंनी व्यक्त केला आहे. उन्हाळ्याची तीव्रता जाणवत असल्याने तात्काळ हे पाणी सोडणे अत्यंत महत्त्वाचे होते.

मात्र हे पाणी सोडलं गेलं नसल्याने लाभधारक शेतकऱ्यांमध्ये तीव्र रोष आहे. पाटबंधारे विभागाने तात्काळ या कालव्याला पाणी सोडण्यात यावे अन्यथा तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा आ. प्राजक्त तनपुरे यांनी दिला आहे.

# मुंबई उपनगर किशोर गट कबड्डी सराव शिबिराचे आयोजन



**अक्षराज : संदिप येवले**

**दि.३०, मुंबई :** मुंबई उपनगर कबड्डी असोसिएशनच्या वतीने किशोर गट मुलांचे पूर्व विभागाचे २८ एप्रिल २०२४ ते २ मे २०२४ या कालावधीत सायं. ६.३० ते ९ वाजेपर्यंत पाच दिवसाचे सराव शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.सराव शिबिर मानेकलाल मैदान घाटकोपर पश्चिम मुंबई ८४ येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरासाठी आंतरराष्ट्रीय खेळाडू, छत्रपती पुरस्कार विजेते प्रशिक्षक यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळणार आहे. सदर शिबिरात मुंबई उपनगर जिल्ह्यातील पूर्व विभागातील १५० खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. किरण देवाडीका, रिबेका गवारे, वीणा खवळे, अमित ताम्हाणेकर, जिग्नेश मोरे, सतिश चव्हाण,पुनीत पुजारी, सुनिल खोपकर, राजेश तुळसकर, विकास उतेकर, हेमंत तोडणकर, संदिप येवले हे प्रशिक्षक म्हणून उपस्थित होते. सराव शिबिरात खेळाडूंना अल्प उपहार दूध, अंडी, पोहे देण्यात येते. मुंबई उपनगर कबड्डी असोसिएशनचे प्रमुख कार्यवाह – राजेश पडेलकर, कोषाध्यक्ष – मिथुन शार्दल यांनी शिबिरास उपस्थित राहून खेळाडूंचे व प्रशिक्षकांचे अभिनंदन केले.

# ऋपरिवर्तनाची' चर्चा... दुष्काळाला ऋपुर्ण विराम' राजकीय दुष्काळाचं करायचं काय?

# शिर्डी, नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील मतदारांमधून प्रचंड नाराजी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, अहमदनगर :** शिर्डी व नगर दक्षिण मतदारसंघात लोकशाहीच्या उत्सवास लोकसभेच्या निवडणुकीला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली आहे. प्रचारात दुष्काळी परिस्थितीत शेतकरी, नागरिकांना दिलासा मिळावा असे कोणताही उमेदवार बोलताना दिसून येत नाही. त्यामुळे या राजकीय दुष्काळाचं करायचं काय ? असा प्रश्न मतदारांना पडला आहे. दोन्ही लोकसभा म तदारसंघात काटाजोड लढती होताना दिसत आहेत.

या लढतीत परिवर्तनाच्या चर्चांना उधाण आले असताना भिषण दुष्काळाचा मुद्दा मात्र हरवून गेला आहे. महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यात मतदान प्रक्रिया पार पडली. वाढत्या तापमानामुळे मतदानाचा टक्का घसरल्याने प्रशासनाने वेगवेगळ्या स्तरावर मतदान करण्याचे आवाहन करत आहे. महाराष्ट्रात विदर्भानंतर सर्वाधिक उन्हाच्या झळा मध्य महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यात बसत आहेत. याम ध्ये उन्हाच्या झळांबरोबर जिल्ह्यातील लोकसभेचे रणांगणही तापू लागले आहे.

दोन्ही बाजूंनी आरोपांच्या फैरी झडू लागल्या आहेत. शिर्डी , नगर दक्षिण लोकसभा निवडणुकीत आता परिवर्तनाच्या चर्चाना उधाण आले आहे. दोन्ही बाजूकडून आम्हाला पोषक वातावरण असल्याचे सांगितले जाते. परंतु ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी जनावरांना चारा, पाणी आणि अभी




पीके वाचविण्यासाठी वीज यासह दूध दराचा प्रश्न मोठा आहे. खाजगी दूध संघाकडून शेतकऱ्यांची गळचेपी सुरू आहे. एकीकडे पशुखाद्याचे वाढलेले भरमसाठ दर आणि दुसरीकडे कमी दिला जाणारा दूध दर यामुळे पशुधन जगविताना शेतकऱ्यांना कसरत करावी लागत आहे. दुष्काळ त्यात वरून अवकाळी पाऊस या नैसर्गिक आपत्तीत कारखानदारांनी केलेली मानवनिर्मित संकटामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. या महत्वाच्या प्रश्नाकडे दोन्ही बाजूचे उमेदवार चकार शब्द बोलताना दिसत नाहीत. त्यामुळे जनतेतून नाराजी व्यक्त केली जात आहे. दुष्काळ हा एकमेव शब्द अनेक शेतकऱ्यांचे जीव घेतो.

शेतकरी शेती कसा जगवतो ? या प्रश्नाचं खर उत्तर त्या शेतकऱ्यांकडेच असते. अर्थात शेतकऱ्यांनी देखील शेतीच्या पारंपारिक पद्धतींना फाटा देऊन आधुनिक तंत्रज्ञान उपयोगात आणायला हवेत आणि अनेक शेतकरी याचा अवलंब करून आज हायटेक शेती करताहेत. पण हा वर्ग खूप कमी आहे. शेतकऱ्याने स्वतः तात बदल करणे हे पहिले महत्त्वाचे पाऊल आहे. दोन प्रकारचे दुष्काळ त्याला कारणीभूत निसर्ग आहे.

तरीही या दोन्ही प्रकारच्या दुष्काळाच्या मुळाशी मात्र माणूस हाच प्राणी आहे. पुढच्या अनेक वर्षाचे आर्थिक गणित एका झटक्यात मोडले जाते. मग शेतकऱ्यांसमोर पर्याय उरत नाही. आपल्या इथल्या कर्जप्रणालीच्या विळख्यासमोर शेतकरी हतबल होतो अन् मृत्यू हाच एकमेव पर्याय मानून तो दोर गळ्याला लावून घेतो. आत्महत्या निश्चितच चुकीचा पर्याय आहे. दुष्काळ, शेतकऱ्यांचे मरण या गोष्टींवर पर्याय म्हणून सरकारने पॅकेज नावाचं एक लॉलीपॉप तयार केलंय.

दुष्काळ येतो, शेतकरी मरतो अन् मग हा तिसऱ्या प्रकारचा ऋ राजकीय दुष्काळ ' उदयास येतो. पाणी टंचाई कसं तरी जीव लावून पिके हाता–तोंडाशी आली की पावसाची झड थांबता थांबत नाही अन् मग रानातच अख्खं पीक गळपाटून जातं. कुणी पुराच्या पाण्यात वाहून गेलं, कुणी वीज पडून म ेलं ,कुणाची घरं पाण्यात बुडाली,गावांचा संपर्क तुटला अशा बातम्या वाचून शेतकरी हैराण होतो. दुष्काळ ओला असो की कोरडा तो शेतकऱ्यांना मात्र मारतोच. पण या दोन्ही दुष्काळानंतर एक नवा दुष्काळ तयार होतो. तो असतो ऋ राजकीय दुष्काळ ' आणि हा दुष्काळ या दोन्ही नैसर्गिक दुष्काळांपेक्षा जास्त खतरनाक आहे.

मागील आठवड्यात जिल्ह्यात अवकाळी पावसाने शेती पिकांचे नुकसान झाले. नुकसान झालेली पीक हातात घेऊन फोटो काढले. एखाद्या शेतकऱ्याकडे जाऊन काहीतरी इमोशनल स्टंट खेळला जातो. मग साहेब कसे ग्रेट हे दाखवलं जातं. मदतीचा गवगवा केला जातो, या मदतीने शेतकऱ्यांच्या आयुष्यात विशेष काय फरक पडतो हे त्या शेतकऱ्यालाच माहिती.

**पारावरच्या गप्पांमध्ये नवा सूर** नुकसानिच्या घशात अडकलेला शेतकरी वर्ग कोणाला साथ देणार हे पाहणे म हत्वाचे ठरणार आहे. गावोगावच्या गावगाड्यातील पारावरच्या गप्पांमध्ये रंगत असलेल्या चर्चांमध्ये नगर दक्षिण मध्ये ऋ पुन्हा कमळ ' फुलणार की ऋ तुतारी वाजणार ' तर शिर्डीतील जनता ऋ हाती मशाल ' धरणार की कमळाच्या फ ुला साथ सोडणार शिर्डीत मशाल,प्रेशर कुकर आणि मनुष्याचे युद्ध, कुकरमध्ये डाळ शिजेल की चटका बसेल! हे पहाणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# माहीती सेवा समितीचा निकश (खरी लढत- विखे, आणि लंके)

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.३०, सुपा (अ.नगर) :** अहिल्यादेवी नगर दक्षिण लोकसभा मतदार संघात खा.सुजय विखे आणी मा.आ.निलेश लंके यांच्यातच खरी चुरशीची लढत होण्याची शक्यता वर्तवन्यात येती,या मतदार संघात ओबीसीचा अपक्ष उमेदवार दिलीप खेडकर यांनी फार्म न काढता निवडनुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यांची भुमिका पहाता नौबौद्य, मांतग, अदिवाशी, माळी, तेली, परीट, गवळी, कैकाडी, सोनार, कुंभार, शिंपी हा समाज आपला आहे. असा समज होउन तो आपल्या बरोबर राहील म्हणून ते निवडनुकीच्या रींगणात उतरले आसावे,पण?त्यांची खुण किटली आहे,त्याच्या किटलीतला चहा कोण, कोण पितोय तो मतदार ठरविल!कारण सरकारने वरील कोणत्याच समाजाच्या आरक्षणात गाल बोट लावलेले नाही.म्हणून आरक्षणाबाबत चिंता नसल्याने तो मतदार हा देशहीत, आणि विकासाच्या मूद्यावर मतदान करील. यात शंका नाही. दक्षिण लोकसभा मतदार संघात अनेक जनांनी फार्म भरले होते त्या पैकी निलेश साहेबराव लंके, डॉ.योगीता चोळके, एमआयएमची माघार डॉ.परवेझ अशरफी यांनी शेवटी माघार घेतली आसल्याने हा सामाना दुरंगीच होणार आहे यात शंका नाही. ज्या उमेदवारांनी माघार घेतली त्यांचा फायदा हा सुजय विखेंना होईल,का? निलेश लंकेला होईल हे मतदारच! ठरवतील,

माहीती सेवा समितीच्या या पुर्विच्या अहवालानुसार, महाराष्ट्रातील राजकीय पटलांवर तीनच राजकीय शक्ती आहेत. त्या म्हणजे, शरद पवार, कै.बाळासाहेब विखे, कै.भाउसाहेब थोरात ह्या शक्ती कधीही बदल घडवुन आनु शकतात, यात शंका नाही. म्हणुन दक्षिण लोकसभा मतदार संघातील निवडनुकीत खरी चुरशीची लढत विखे आणी लंके यांच्यातच होणार आहे. तरी सर्व सामान्य सुज्ञ मतदार हा देशहीत, आणी विकास कामाकडे पाहुनच मतदान करील असा निकस माहीती सेवा समितीने काढला आहे.